# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

सकाळ

५

### रोडरोमिओंना रोखण्यासाठी राजगुरूनगरला बैठक

प्रभात पुणे, बुधवार, दि. २२ नोव्हेंबर २०१७

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसवा

#### आमदार गोरे : छेडछाडीच्या पार्श्वभूमीवर राजगुरूनगरमध्ये बैठक

**विद्यार्थिनींनो तक्रार करा**

राजगुरुनगर : महाविद्यालयात बैठक; सीसीटीव्ही लावण्याचे आवाहन

# टवाळखोरांवर होणार कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : राजगुरुनगर येथे टवाळखोरांवर वचक बसविण्यासाठी विद्यालय परिसरात सीसीटीव्ही लावण्याच्या सूचना करण्यात आल्या. पत्रपरिचय विद्यार्थ्यांना गणवेश आणि मोबाईल नेण्यासही बंदी करण्यात आली आहे. भांडणे तसेच टवाळखोर आढळल्यास त्यांना थेट महाविद्यालयातून काढण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

## एसटी स्टॅण्ड परिसरात लवकरच सीसीटीव्ही



- महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी संस्थेची असून महाविद्यालयात ओळखपत्राशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश नसतो. जे विद्यार्थी महाविद्यालयाच्या शिस्तीस बाधा आणतील त्यांचा प्रवेश रद्द करणार असल्याचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी सांगितले.
- खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष हरिभाऊशेठ सांडभोर यांनी लवकरात लवकर एसटी स्टँड परिसरात सीसीटीव्ही लावणार असल्याचे सांगितले. विद्यार्थिनींची कोणी छेडछाड करीत असेल किंवा कोणी उपद्रव त्रास देत असेल तर संबंधितांनी खेड पोलीस ठाणे, उपविभागीय पोलीस अधिकारी राम पठारे, पोलीस निरीक्षक प्रदीप जायभाय किंवा हुतात्मा राजगुरू महाविद्यालय प्रशासनाला संपर्क करावा.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराबाहेर काही शाळाबाह्य तरुण व समाजकंटकांकडून होणाऱ्या हाणामाऱ्या आणि एसटी स्टँड परिसरात मुलींची होणारी छेडछाड या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश गोरे यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी राम पठारे, पोलीस निरीक्षक प्रदीप जायभाय, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष हरिभाऊ सांडभोर, सचिव एस. कमोड व्यंकट गणेश जोशी, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

या वेळी आमदार सुरेश गोरे यांनी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ व खेड तालुका एज्युकेशन सोसायटी या दोन्ही संस्थांना एसटी स्टँड व महाविद्यालयाच्या बाहेर सीसीटीव्ही लावण्याचे आवाहन केले. महाविद्यालयात मुलींसाठी स्वतंत्र तक्रारपेटी बसविण्याची सूचना केली. एसटी स्टँड व महाविद्यालयासमोरील राष्ट्रीय महामार्गावर रस्ता दुभाजक व दोन्ही बाजूस २ मीटरचा पदपथ लवकरच होणार आहे. यामुळे महामार्ग सुरक्षित होऊन मुलांना विद्यालयात येण्या-जाण्यास अडथळा येणार नाही, असे त्यांनी सांगितले.

उपविभागीय पोलीस अधिकारी राम पठारे म्हणाले, महाविद्यालय परिसरात हाणामारी झाल्यास पोलिसांशी तत्काळ संपर्क साधावा. महाविद्यालयात मोबाइल बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई करून त्यांचे मोबाइल जप्त करावेत. संबंधित विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून तत्काळ काढून टाकण्याची आणि विद्यार्थ्यांना ड्रेसकोड महाविद्यालयीन प्रशासनाने सक्तीचा करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. याबाबतीत पालकांनी संस्थेला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. मुलींच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र निर्भया पथकाची व्यवस्था केली असून, महाविद्यालयात प्रवेश नसलेले बिनकामाचे कोणी दिसल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी महाविद्यालयाच्या आतमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या आतमध्ये कोणत्याही प्रकारची हाणामारी होत नाही. विद्यार्थी शिस्तीसंदर्भात वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांची स्वतंत्र समिती कार्यान्वित करण्यात आली आहे, असे सांगितले. पालकांनी आपल्या पाल्याच्या आचरण, उपस्थिती, पर्स यांकडे विशेष लक्ष द्यावे. यासंबंधी वेळोवेळी महाविद्यालयाकडे चौकशी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

4 | बुधवार, २२ नोव्हेंबर २०१७ | पुणे

# एसटी स्टँडसह महाविद्यालयात सीसीटीव्ही लावा : आ. सुरेश गोरे

| राजगुरुनगर : प्रतिनिधी

महाविद्यालय परिसरातील टवाळखोर मुलांच्या हाणामाऱ्या आणि मुलींची छेडछाड रोखण्यासाठी एसटी स्टँड व महाविद्यालयाच्या बाहेर सीसीटीव्ही लावावेत. तसेच महाविद्यालयात मुलींसाठी स्वतंत्र तक्रार पेटी बसवावी, अशी सूचना आमदार सुरेश गोरे यांनी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ व खेड तालुका एज्युकेशन सोसायटी या दोन्ही संस्थांना केली.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराबाहेर काही टवाळखोर तरुण व समाजकंटकांकडून होणाऱ्या हाणामाऱ्या आणि एस.टी. स्टँड परिसरात मुलींची होणारी छेडछाड या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश गोरे यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी राम पठारे, पोलीस निरीक्षक प्रदीप जाधव, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष हरिभाऊ सांडभोर, संचालक गणेश जोशी, बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, जी. जी. गायकवाड, कैलास पाचारणे उपस्थित होते.

उपविभागीय पोलीस अधिकारी राम पठारे म्हणाले, महाविद्यालय परिसरात हाणामारी झाल्यास आमच्याशी तत्काळ संपर्क साधण्यास सांगितले. महाविद्यालयात मोबाइल आणणाऱ्या विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई करून त्यांचे मोबाइल जप्त करावेत.

संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले, महाविद्यालयात सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. महाविद्यालयाच्या आत कोणत्याही प्रकारची हाणामारी होत नाही. विद्यार्थी शिस्तीसंदर्भात वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांची स्वतंत्र समिती कार्यान्वित करण्यात आली आहे. पालकांनी आपल्या पाल्याचा अभ्यास, उपस्थिती, वर्तन याकडे विशेष लक्ष द्यावे. पाल्याची वेळोवेळी महाविद्यालयाकडे चौकशी करावी, असे आवाहन त्यांनी केले. हरिभाऊ सांडभोर व नानासाहेब टाकळकर यांनी मार्गदर्शन केले.

१० केसरी पुणे, २९ नोव्हेंबर २०१७

# महाविद्यालयाबाहेरील शिस्तीसंदर्भात बैठकीचे आयोजन

राजगुरुनगर, (वार्ताहर) : येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराबाहेर काही टवाळखोर तरुण व समाजकंटकांकडून होणाऱ्या हाणामाऱ्या आणि एसटी स्थानक परिसरात मुलींची होणारी छेडछाड या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश गोरे यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी राम पठारे, पोलीस निरीक्षक प्रदीप जाधव, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, गणेश जोशी, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

आमदार सुरेश गोरे यांनी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ व खेड तालुका एज्युकेशन सोसायटी या दोन्ही संस्थांना एसटी स्थानक व महाविद्यालयाच्या बाहेर सीसीटीव्ही लावण्याचे आवाहन केले. तसेच महाविद्यालयात मुलींसाठी स्वतंत्र तक्रार पेटी बसविण्याची सूचना केली. एसटी स्थानक व महाविद्यालयापर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गावर रस्ता दुभाजक व दोन्ही बाजूस २ मीटरचा फुटपाथ लवकरच होणार असून त्यामुळे वाहतूक सुरळीत होऊन मुलांना महाविद्यालयात येण्या-जाण्यास अडथळा येणार नाही, असे सांगितले.

उपविभागीय पोलीस अधिकारी राम पठारे यांनी महाविद्यालय परिसरात हाणामारी झाल्यास आमच्याशी तात्काळ संपर्क साधण्यास सांगितले. महाविद्यालयात मोबाईल आणणाऱ्या विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई करून त्यांचे मोबाइल जप्त करावेत. तसेच संबंधित विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून तत्काळ काढून टाकण्याची आणि विद्यार्थ्यांना ड्रेसकोड करण्याची सूचना त्यांनी संस्था व प्रशासनाला केली. याबाबतीत पालकांनी संस्थेला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. मुलींच्या सुरक्षेतेसाठी स्वतंत्र निर्भया पथकाची व्यवस्था केली असून महाविद्यालयात प्रवेश नसलेले विनाकारणाचे कोणी दिसल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थिनींशी कोणी छेडछाड करीत असेल किंवा कोणी त्रास देत असेल तर संबंधितांनी खेड पोलीस ठाणे (०२१३५२२२०३३), उपविभागीय पोलीस अधिकारी राम पठारे (९९२३७९८४३८), पोलीस निरीक्षक प्रदीप जाधव (९५५२५००७५७) किंवा हुतात्मा राजगुरु महाविद्यालय प्रशासन (०२१३५२२२०९९) या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी सर्वांचे स्वागत करून आभार मानले.



महाराष्ट्र टाइम्स, पुणे ■ गुरुवार, २३ नोव्हेंबर २०१७

# छेडछाड रोखण्यासाठी उपाय

म. टा. वृत्तसेवा, राजगुरुनगर

**तक्रारीसाठी क्रमांक**

[illegible]

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात बैठक

[illegible]

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख